वृत्तपत्र : सकाळ, पुणे
दिनांक : १५/११/२००५

## यंदाच्या दिपावलीत ध्वनिप्रदूषण घटले !

नागरिकांमध्ये ध्वनिप्रदूषणाच्या समस्येची जाणीव वाढत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिवाळीच्या काळात केलेल्या पाहणीत गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी फटाक्यांमुळे झालेल्या ध्वनिप्रदुषणाची पातळी लक्षणीयरित्या घटल्याचे दिसून आले आहे.

**मंडळाचे सदस्य सचिव डॉ.दिलीप बोराळकर** यांनी या पाहणीचा अहवाल नुकताच जाहीर केला. **मंडळाचे विभागीय अधिकारी डॉ.अजय देशपांडे** यांच्या नियंत्रणाखाली प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी एक ते तीन नोव्हेंबर या काळात राज्यातील अकरा शहरांमध्ये सांयकाळी सात ते रात्री बारा या वेळात ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजली. मुंबई, पुणे, नवी मुंबई, नाशिक , नागपूर, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, कोल्हापूर औरंगाबाद या शहरांमध्ये एकूण शंभर ठिकाणी ही पातळी मोजण्यात आली. पुणे मुंबईसारख्या शहरांमध्ये रात्री अकरानंतर अतिशय तुरळक प्रमाणात फटाक्यांचे आवाज होते, असेही मंडळाच्या पाहणीत आढळले. या पाहणीसाठी लोकवस्तीचा भाग निवडण्यात आला होता. ज्या ठिकाणी इमारती आहेत, अशा ठिकाणीही आवाजाची पातळी मोजण्यात आली. दिपावलीच्या पहिल्या दिवशी म्हणजेच एक नोव्हेंबरला गेल्या वर्षीच्या तुलनेत फटाक्याचे प्रमाण नगण्य होते, असे मंडळाने अहवालात नोंदवले आहे.

दिपावलीच्या काळात आवाजाची पातळी सर्वच ठिकाणी सरासरी ५५ ते ७५ डेसिबल्स असल्याचे तपासणीत आढळले. हे प्रमाण आवाजाच्या ५५ (सकाळी) आणि ४५ (रात्री) डेसिबल्सच्या सुसहय पातळीपेक्षा जास्त असले, तरीही गेल्यावर्षी यापेक्षाही जास्त आवाज दिपावलीच्या काळात आसमंतात घुमत होते. असे मंडळाचे म्हणणे आहे. ध्वनिप्रदूषणाबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढत असल्याचा निष्कर्ष मंडळाने या पाहणीतून काढला आहे.